# डॉ. आंबेडकर कॉलेज, दीक्षाभूमी, नागपूर

## मराठी विभाग

## वार्षिक अहवाल 2019-2020

---

### मराठी वाङ्मय मंडळाचे उद्घाटन

दिनांक:- 23/08/2019

डॉ. आंबेडकर महाविद्यालय,दीक्षाभूमी, नागपूर येथील मराठी विभागाच्या वतीने दिनांक 23/08/2019 ला दादासाहेब कुंभारे सभागृहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून मराठी विभागप्रमुख प्रा. दीपककुमार खोब्रागडे तर प्रमुख अतिथि म्हणून परमपुज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे सदस्य विलास गजघाटे उपस्थित होते. प्रमुख वक्ता म्हणून कवि व समीक्षक डॉ. बळवंत भोयर तसेच कवि व माजी पोलिस अधिकारी गंगाधर पाटील उपस्थित होते. कार्यक्रमाचे उद्घाटन सुप्रसिद्ध साहित्यिक डॉ. भाऊ लोखंडे यांनी केले. त्यांनी आपल्या भाषणात आंबेडकरवादी साहित्य हाच भारतीय साहित्याचा मूलाधार आहे. आणि त्यामुळे भारतीय साहित्यात अभूतपूर्व क्रांति घडून आली. या कार्यक्रमाचे संचालन डॉ. रवींद्र तिरपुडे यांनी तर आभार प्रा. अमित दुर्योधन यांनी मानले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.


DR. AMBEDKAR COLLEGE
DEEKSHA BHOOMI,
NAGPUR.

डॉ. आंबेडकर महाविद्यालय
दीक्षाभूमी, नागपूर
॥ पदवी व पदव्युत्तर मराठी विभाग ॥
मराठी वाङ्मय मंडळ

Unnamed Road, Ramdaspeth, Nagpur, Maharashtra 440010, India
Nagpur
Maharashtra
India
29°C
84°F
2019-08-23(Fri) 10:57(AM)

Unnamed Road, Ramdaspeth, Nagpur, Maharashtra 440010, India
Nagpur
Maharashtra
India
29°C
84°F
2019-08-23(Fri) 11:14(AM)

# <u>वकृत्व स्पर्धा</u>

दिनांक:- 06/09/2019

डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी, नागपूर येथे मराठी विभागातर्फे दिनांक 20/09/2019 ला “मराठी भाषा समृद्ध करण्यासाठी विद्यार्थांचे योगदान या विषयावर वकृत्व स्पर्धा घेण्यात आली. या स्पर्धेमध्ये सत्तेचाळीस विद्यार्थांनी सहभाग नोंदवला होता.





<u>राष्ट्रीय चर्चासत्र</u>

दिनांक:- 30/01/2020

डॉ. आंबेडकर महाविद्यालयात दिनांक 30/01/2020 ला मराठी विभागातर्फे मुकनायक पाक्षिकाच्या शताब्दीनिमित्य राष्ट्रीय चर्चासत्र घेण्यात आले. या कार्यक्रमाला अध्यक्ष म्हणून परमपुज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे अध्यक्ष मा. पुज्य भंते नागार्जुन सुरई ससाई उपस्थित होते. कार्यक्रमाचे उद्घाटन सुप्रसिद्ध पत्रकार व लेखक मा. सुरेश द्वादशीवार यांनी केले. विशेष अतिथि म्हणून परमपुज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे सदस्य मा. एन. आर. सुटे व मा. विलसजी गजघाटे उपस्थित होते. विशेष प्रमुख म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. आर. व्ही. पाटील होते. शोषितांचे बातमीपत्र नव्हे तर संदेशपत्र होते मुकनायक अश्या शब्दात सुरेश द्वादशीवार यांनी मुकनायकचा गौरव केला. विशेष मान्यवरांच्या भाषणात दोन सत्र व समारोप व त्यानंतर काव्यसंमेलन घेण्यात आले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख प्रा. दीपककुमार खोब्रागडे यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. रविंद्र तिरपुडे तर आभार प्रा. अमित दुर्योधन यांनी मानले. या कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.






शताब्दी महोत्सव
राष्ट्रीय चर्चासत्र


1920-2020
राष्ट्रीय चर्चासत्र


राष्ट्रीय चर्चासत्र




डॉ. आंबेडकर महाविद्यालय, दीक्षाभूमी, नागपूर
मूकनायक शताब्दी महोत्सव
1920-2020
राष्ट्रीय चर्चासत्र
विषय :- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता
दि. ३० जानेवारी २०२०


मूकनायक
डॉ. आंबेडकर महाविद्यालय, दीक्षाभूमी, नागपूर
मूकनायक शताब्दी महोत्सव
1920-2020
राष्ट्रीय चर्चासत्र
दि. ३० जानेवारी २०२०


डॉ. आंबेडकर महाविद्यालय, दीक्षाभूमी, नागपूर
मूकनायक शताब्दी महोत्सव
1920-2020
राष्ट्रीय चर्चासत्र
विषय :- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता
दि. ३० जानेवारी २०२०
DEEKSHA BHOOMI,


डॉ. आंबेडकर महाविद्यालय, दीक्षाभूमी, नागपूर
मूकनायक शताब्दी महोत्सव
1920-2020
राष्ट्रीय चर्चासत्र
विषय :- डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता
दि. ३० जानेवारी २०२०
DR. AMBEDKAR COLLEGE
DEEKSHA BHOOMI,
NAGPUR


मूकनायक शताब्दी महोत्सव
1920-2020
राष्ट्रीय चर्चासत्र
DR. AMBEDKAR COLLEGE
DEEKSHA BHOOMI,
NAGPUR

# <u>मराठी भाषा गौरव दिवस</u>

दिनांक:- 27/02/2020

डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी, नागपूर येथे मराठी विभागातर्फे मराठी भाषा गौरव दिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी अध्यक्षस्थानी प्रा. दीपककुमार खोब्रागडे होते. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून वाणिज्य विभागाचे डॉ. विवेक खूनकर, डॉ.प्रभज्योत कौर व मराठी वाङ्मय मंडळाचे प्रा. डॉ. रवींद्र तिरपुडे उपस्थित होते. प्रा. दीपककुमार खोब्रागडे म्हणाले, जगात मराठी भाषेला पोहोचण्याचे काम मराठी मराठीतील दलित साहित्याने केले, उपरा, उचल्या, बलुतं यासारख्या मराठी आत्मचरित्राने मराठी भाषेचा गौरव जगात केला. त्यामुळे विद्यार्थांनी मराठी भाषेतून आपल्या ज्ञानाच्या कक्षा वृंदावल्या पाहिजे असे प्रतिपादन त्यांनी याप्रसंगी केले. डॉ. विवेक खूनकर यांनी यांनी मराठी भाषा किती महत्वाची आहे. याविषयी मार्गदर्शन केले. इंग्रजी,हिन्दी,भाषेच्या तुलनेत मराठी भाषेचा गोडवा काही अधिकच असतो असे त्यांनी संगितले. डॉ. प्रभज्योत कौर यांनी भारतातील प्रत्तेक भाषिकांना आपल्या भाषेचा गौरव केला पाहिजे व आपली संस्कृती टिकवून ठेवण्यासाठी मातृभाषेतुणच बोलले पाहिजे, असा संदेश त्यांनी दिला. प्रास्ताविक मराठी वाङमय मंडळाचे संयोजक प्रा.डॉ. रवींद्र तिरपुडे यांनी केले. सूत्रसंचालन अंकित मालखेडे यांनी तर आभार निखिल मोटघरे यांनी केले.




डॉ आंबेडकर कॉलेज दीक्षाभूमी नागपूर
मराठी विभाग
मराठी भाषा गौरव दिवस
२७.०२.२०२०

डॉ आंबेडकर कॉलेज दीक्षाभूमी नागपूर
मराठी विभाग
मराठी भाषा गौरव दिवस
२७.०२.२०२०


मराठी विभाग
मराठी भाषा गौरव दिवस
२७.०२.२०२०
Unnamed Road, Nagpur, Maharashtra 440010, India
Nagpur
Maharashtra
India
2020-02-27(Thu) 10:29(AM)

मराठी विभाग
मराठी भाषा गौरव दिवस
२७.०२.२०२०

<u>आंतर महाविद्यालयीन मराठी प्रश्नोत्तरी स्पर्धा</u>

दिनांक:-09/05/2020

डॉ. आंबेडकर कॉलेज, दीक्षाभूमी, नागपूर येथील मराठी विभागातर्फे ऑनलाईन प्रश्नमंजूषा स्पर्धेचे दिनांक 09/05/2020 ते 12/05/2020 ला आयोजित करण्यात आले होते. या स्पर्धेत जवळपास 500 स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. सर्व सहभागी स्पर्धकांना ऑनलाईन प्रमाणपत्र पाठविण्यात आले. या स्पर्धेचे मुख्य संयोजक डॉ. रवींद्र तिरपुडे होते.



आंतर महाविद्यालीन मराठी प्रश्नोत्तरी स्पर्धा
आंतर महाविद्यालीन मराठी प्रश्नोत्तरी स्पर्धेमध्ये आपणा सर्वांचे स्वागत आहे. ही स्..
docs.google.com

डॉ. आंबेडकर महाविद्यालय, दीक्षाभूमी, नागपूर

" प्रश्नमंजुषा २०२०" (१०० गूण)
डॉ. आंबेडकर कॉंलेज,दीक्षाभूमी नागपूर येथील मराठी विभागाद्वारे प्रश्नामंजुषेचे आयोजन केले आहे. या स्पर्धत सर्व वयोगटातील व्यक्ती प्राध्यापक विद्यार्थी सहभागी होऊ शकतात।
कृपया खालील लिंक उघडून, सर्व प्रश्नाचे उत्तर देऊन सादर करावी ही
https://forms.gle/aCdGptTUh3oVHrbs5
सूचना
1. सर्व ५० प्रश्न सोडवणे बंधनकारक आहे
2. ५० टक्के किंवा अधिक गुण प्राप्त केले त्यांना EMAIL द्वारे त्वरित प्रमाणपत्र पाठवण्यात येईल.
3. ही प्रश्नमंजुषा २० मे पर्यंत चालू राहील.
4. दर दिवसाला १०० प्रमाणपत्र पाठवले जातील,

प्रा.आर.व्ही.पाटील
प्राचार्य
डॉ. आंबेडकर कॉंलेज, दीक्षाभूमी, नागपूर

डॉ. रवींद्र तिरपुडे
समन्वयक
मराठी विभाग

प्रा.दीपककुमार खोब्रागडे
मराठी विभाग प्रमुख


11:58 pm


<u>ऑनलाईन राष्ट्रीय काव्यसंमेलन</u>

दिनांक:-17/05/2020

जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळ आणि डॉ. आंबेडकर कॉलेज, दीक्षाभूमी, नागपूर यांच्या संयुक्त विद्‌यमाने, आजचे सामाजिक वास्तव या विषयावर ऑनलाईन राष्ट्रीय काव्यसंमेलन दिनांक 17 मे 2020, रविवारला आयोजित करण्यात आले होते. या काव्यसंमेलनात जवळपास 45 कवींनी सहभाग घेतला होता. सर्व सहभागी कवींना ऑनलाईन सन्मानपत्र देण्यात आले. या काव्यसंमेलनाचे मुख्य संयोजक डॉ. रवींद्र तिरपुडे होते.




Ambedkar College
Ankit Malkhede
Suresh khobraga...
Prathamesh Bho...
Dr. Vishakha Ka...
Ratnnadeep Saw...
Shailesh D. Sautk...
Dr. Anil Surya
Bharati Dawane
OPPO A5s
Ganesh Pande
Kalyan shravasti
6Y4yQ9
Vidyadhar Bansod
yashawant khada...
Dipakkumar kho...
Galaxy A7 (2017)
मनोहर नरांजे
Sushil Gangaram m...
Moto G (5S) Plus
PUNARWASU SA...
Bharatbhushan s...
meenakhond
Dr Leenanikam1
Dr.Ashok Ingle
SRI COLONY
श्री कॉलनी
Mhalginagar Sub Post Office
RO Plant Manufacturer Red Circle
GHATE LAYOUT
Google
220, Santoshi Nagar, Chandrakiran Nagar, Nagpur, Maharashtra 440034, India
Nagpur
Maharashtra
India
39°C
102°F
2020-05-17(Sun) 03:05(PM)


Ambedkar College
Ankit Malkhede
Moto G (5S) Plus
Prathamesh Bhoyar
Dr. Vishakha Ka...
Shailesh D. Sautk...
Dr. Anil Surya
Bharati Dawane
OPPO A5s
Ganesh Pande
Kalyan shravasti
Vidyadhar Bansod
Dipakkumar kho...
Galaxy A7 (2017)
मनोहर नरांजे
Sushil Gangaram m...
PUNARWASU SA...
Bharatbhushan s...
meenakhond
Dr Leenanikam1
Nagpur
Maharashtra
India
39°C
102°F
2020-05-17(Sun) 03:10(PM)

<u>ऑनलाईन आंतरराष्ट्रीय चर्चासत्र</u>

दिनांक:-14/06/2020

जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळ आणि डॉ. आंबेडकर कॉलेज, दीक्षाभूमी, नागपूर. आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन, सातारा. कला व विज्ञान महाविद्यालय भालोद, जिल्हा जळगाव. श्रीमती एल. आर. टी. कॉलेज ऑफ कॉमर्स, अकोला. शरदराव पवार आटर्स व कॉमर्स कॉलेज, गडचांदूर, जिल्हा: चंद्रपूर. सुवालाल पाटणी कला व वाणिज्य महाविद्यालय, पुलगाव, जिल्हा: वर्धा. यांच्या संयुक्त विद्यमाने, कोरोना: जागतिक साहित्य व शिक्षणापुढील आव्हाने या विषयावर ऑनलाईन आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन दिनांक 14 जून 2020 ला करण्यात आले होते. या ऑनलाईन चर्चासत्रात सर्व मान्यवरांनी, कोरोना: जागतिक साहित्य व शिक्षणापुढील आव्हाने यावर भाष्य केले. या ऑनलाईन आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात जवळपास 2000 संशोधक/प्राध्यापका/विद्यार्थांनी नोंदणी केली होती. सर्वांना ऑनलाईन प्रमाणपत्र पाठविण्यात आले. या ऑनलाईन आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे मुख्य संयोजक डॉ. रवींद्र तिरपुडे होते.




2:03 PM
VoLTE
34%
Recording
QCOM-BTD
Shripad.Aparajit
BALWANT BHOYAR
Ravindra Tirpude


3:08 PM
31.1K/s
VoLTE
27%
Recording
QCOM-BTD
Shripad.Aparajit
BALWANT BHOYAR
Purushottam's iPa


3:07 PM
24.9K/s
VoLTE
26%
Recording
QCOM-BTD
Shripad.Aparajit
BALWANT BHOYAR
Purushottam's iPa

<u>वर्तमानपत्रात प्रसिद्ध झालेल्या बातम्या</u>

महाराष्ट्र टाइम्स नागपूर । शुक्रवार, २३ ऑगस्ट २०१९

# मराठी वाङ्मय मंडळाचे आज उद्घाटन

**नागपूर :** दीक्षाभूमी येथील डॉ. आंबेडकर महाविद्यालयाच्या मराठी विभागाच्या पदवी व पदव्युत्तर विभागातर्फे मराठी वाङ्मय मंडळाचा





उद्घाटन सोहळा शुक्रवार, २३ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आला आहे. ज्येष्ठ विचारवंत डॉ. भाऊ लोखंडे यांच्या हस्ते वाङ्मय मंडळाचे उद्घाटन करण्यात येणार असून प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे सदस्य विलास गजघाटे, कवी बळवंत भोयर, समीक्षक डॉ. भूषण रामटेके यांची उपस्थती राहील. अध्यक्षस्थानी मराठी विभागप्रमुख डॉ. दीपककुमार खोब्रागडे राहतील, तर सूत्रसंचालन डॉ. रवींद्र तिरपुडे करतील. या सोहळ्याला विद्यार्थ्यांनी उपस्थित राहावे, असे आवाहन विभागातर्फे करण्यात आले आहे.

# आंबेडकरवादी विचारानेच भारतीय साहित्यात क्रांती : डॉ. भाऊ लोखंडे

## मराठी वाङ्मय मंडळाचे उद्‌घाटन

*प्रतिनिधी / ३० ऑगस्ट*

**नागपूर :** आंबेडकरवादी साहित्य आज भारतीय साहित्याचा मुलाधार आहे. या साहित्यानेच एकूणच मराठी व भारतीय साहित्यात अभूतपूर्व क्रांती झाली आहे. स्वातंत्र्योत्तर काळानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना प्रेरणा मानून अनेक तळागाळातील लेखकांनी आपला विद्रोही विचार साहित्यातून प्रगट केला व आज हेच साहित्य समाजप्रबोधनाचे प्रमुख हत्यार झालेले आहे. बाबुराव बागुल, गिरीश कर्नाड, गंगाधर पानतावणे, कमलेश्वर यासारख्या दिग्गज साहित्यिकांच्या विचारांवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या क्रांतीकारी विचारांचा प्रभाव होता. आज भारतीय साहित्य आंबेडकरवादी साहित्याशिवाय पुढे जाऊ शक्त नाही, असे आवाहन डॉ. भाऊ लोखंडे यांनी केले.



दीक्षाभूमी येथील डॉ. आंबेडकर महाविद्यालय येथील पदवी व पदव्युत्तर मराठी विभागातर्फे आयोजित मराठी वाङ्मय मंडळाचे उद्‌घाटन प्रा.डॉ. भाऊ लोखंडे यांच्या हस्ते दादासाहेब कुंभारे सभागृहात करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मराठी विभागप्रमुख प्रा. दीपक्कुमार खोब्रागडे तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडक्र स्मारक समितीचे सदस्य विलास गजघाटे उपस्थित होते. प्रमुख वक्ता म्हणून कवी व समीक्षक बळवंत भोयर, तसेच क्वी व माजी पोलिस अधिकारी गंगाधरराव पाटील उपस्थित होते.

यावेळी गंगाधरराव पाटील, भंते हर्षबोधी, आदींनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

क्वार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता प्रा. कल्पना काळे, प्रा. दिवाकर ढोबळे, अंकित मालखेडे, विक्रम ढोके, जान्हवी देवगडे, शीतल राठोड, पूजा पगारे, रोशन भोयर, विनीत दुपारे आदींनी सहकार्य केले. संचालन डॉ. रवींद्र तिरपुडे तर आभार प्रा. अमित दुर्योधन यांनी मानले.

ePaper देशोन्नती
Sat, 31 August 2019
https://deshonnati.digitaledition.in/c/43080650



# आंबेडकरवादी विचारच समाजाला पुढे नेतील

## डॉ. भाऊ लोखंडे यांचे प्रतिपादन

## आंबेडकर महाविद्यालयात मराठी वाङ्मय मंडळाचे उद्‌घाटन



**पुण्य नगरी / प्रतिनिधी**

नागपूर : आंबेडकरवादी साहित्य आज भारतीय साहित्याचा मुलाधार आहे. या साहित्याने एकूणच मराठी व भारतीय साहित्यात अभूतपूर्व क्रांती झाली आहे. स्वातंत्र्योत्तर काळानंतर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांना प्रेरणा मानून तळागाळातील लेखकांनी आपला विद्रोही विचार साहित्यातून प्रगट केला व आज हेच साहित्य समाजप्रबोधनाचे प्रमुख हत्यार झाले आहे. भारतीय साहित्य आंबेडकरवादी साहित्याशिवाय पुढे जाऊ शकत नाही. समाजातील धर्मांधता, अंधश्रद्धा, जातीयता दूर करायची असेल तर आंबेडकरवादी विचाराशिवाय पर्याय नाही, असे प्रतिपादन सुप्रसिद्ध विचारवंत डॉ. भाऊ लोखंडे यांनी केले.

डॉ. आंबेडकर महाविद्यालय, दीक्षाभूमी येथील पदवी व पदव्युत्तर मराठी विभागातर्फेआयोजित मराठी वाङ्मय मंडळाचे उद्‌घाटन सुप्रसिद्ध विचारवंत प्रा. डॉ. भाऊ लोखंडे यांच्या हस्ते दादासाहेब कुंभारे सभागृहात करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे सदस्य विलास गजघाटे, प्रमुख वक्ता म्हणून सुप्रसिद्ध कवी व समीक्षक बळवंत भोयर, भंते हर्षबोधी, कवी व माजी पोलीस अधिकारी गंगाधरराव पाटील उपस्थित होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयातील मराठी विभाग प्रमुख प्रा. दीपककुमार खोब्रागडे होते. बळवंत भोयर म्हणाले, आजचा विद्यार्थी हाच साहित्याचा आणि समाजाचा आरसा आहे. संत गाडगेबाबा, महर्षी कर्वे, पंजाबराव देशमुख, कर्मवीर भाऊराव पाटील व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांनीच तो भविष्यातील परिवर्तनाची क्रांती करू शकतो. कुठलेही साहित्य हे विद्यार्थांनी अंगीकारले तर भारत उद्या बलशाली राष्ट्र म्हणून पुढे येईल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

अध्यक्षीय भाषणात दीपककुमार खोब्रागडे म्हणाले मराठी साहित्यात विविध वाङ्‌यीन प्रवाह आहेत. परंतु आंबेडकरवादी साहित्य हा केवळ मराठी साहित्याचा प्रवाह नसून आज एकूणच जागतिक साहित्याचा महत्त्वाचा प्रवाह आहे. विद्यार्थ्यांनी या विचारांचा अवलंब केल्यास तो जीवनात परिवर्तनाचा वाहक ठरेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. याप्रसंगी विलास गजघाटे, भंते हर्षबोधी व कवी गंगाधरराव पाटील यांनीही विचार मांडले. संचालन डॉ. रवींद्र तिरपुडे यांनी केले. प्रा. अमित दुर्योधन यांनी आभार मानले.

या कार्यक्रमाला विद्यार्थी व प्राध्यापकांची भरगच्च उपस्थिता होती. कल्पना काळे, प्रा. दिवाकर ढोबळे, अंकित मालखेडे, विक्रम ढोके, जान्हवी देवगडे, शीतल राठोड, पूजा पगारे, रोशन भोयर, विनीत दुपारे यांनी आयोजनासाठी परिश्रम घेतले.

# मूकनायक शताब्दी महोत्सव आज

## राष्ट्रीय चर्चासत्र, कविसंमेलनही

म. टा. प्रतिनिधी, नागपूर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी ३१ जानेवारी १९२० साली 'मूकनायक' या नावाने पाक्षिक काढले आणि दलित-वंचित समाजाचा आक्रोश पहिल्यांदा नियतकालिकांच्या माध्यमातून जगासमोर आला. २०२० हे वर्ष 'मूकनायक' चे शताब्दी वर्ष म्हणून साजरे केले जात असून, त्यानिमित्त आज ३० जानेवारी रोजी दादासाहेब कुंभारे सभागृह, दीक्षाभूमी येथे राष्ट्रीय चर्चासत्र व कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

महोत्सवाचे उद्घाटन ज्येष्ठ पत्रकार व साहित्यिक सुरेश द्वादशीवार यांच्या हस्ते गुरुवारी सकाळी १० वाजता होणार आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, दीक्षाभूमीचे अध्यक्ष भंते नागार्जुन सुरेई ससाई यांच्या अध्यक्षतेत होणाऱ्या या कार्यक्रमाचे मार्गदर्शक सदानंद फुलझेले आहेत. समितीचे सदस्य एन. आर. सुटे व विलास गजघाटे यांची विशेष उपस्थिती राहणार असून, डॉ. आंबेडकर कॉलेजचे प्राचार्य आर. व्ही. पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहील.

डॉ. आंबेडकरांनी त्यांच्या जीवनात केलेल्या पत्रकारितेचे स्मरण व्हावे व त्यांच्या या कार्याला अभिवादन करण्यासाठी दीक्षाभूमी येथील डॉ. आंबेडकर कॉलेजच्यावतीने 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता' विषयावर चर्चासत्र दुपारी १२.३० वाजता होईल. महानायकचे संपादक सुनील खोब्रागडे अध्यक्षस्थानी राहणार असून, प्रा. जावेद पाशा, डॉ. विद्याधर बनसोड, डॉ. सिद्धार्थ बुटले, डॉ. विशाखा कांबळे, नरेंद्र शेलार, डॉ. मनोहर नाईक, डॉ. शंकर बागडे यांचा सहभाग राहील. दुपारी २ वाजता 'पुरागामी चळवळी आणि आजची पत्रकारिता' या विषयावरील परिसंवादाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ संपादक शैलेश पांडे राहणार आहेत. डॉ. सतीश पावडे, डॉ. बळवंत भोयर, डॉ. भीमराव गोटे, सुरेंद्र गोंडाणे, महेंद्र गायकवाड, डॉ. ईश्वर सोमनाथे व डॉ. भूषण रामटेके यांचा त्यात सहभाग राहील.

दुपारी ३.३० वाजता महोत्सवाचा समारोप ज्येष्ठ संपादक प्रकाश दुबे यांच्या अध्यक्षतेत होणार आहे. प्रसिद्ध मेंदूरोगतज्ज्ञ डॉ. चंद्रशेखर मेश्राम व महाराष्ट्र टाइम्सचे निवासी संपादक श्रीपाद अपराजित यांची प्रमुख उपस्थिती राहील. या चर्चासत्राचे मुख्य संयोजक प्रा. दीपककुमार खोब्रागडे आहेत.

### कविसंमेलन




ज्येष्ठ आंबेडकरवादी कवी इ. मो. नारनवरे यांच्या अध्यक्षतेत 'मूकनायक' शताब्दी कविसंमेलनाचे सायंकाळी ५ वाजता समारोपीय सत्रानंतर आयोजन करण्यात आले असून, त्यात १०० निमंत्रित कवी सहभागी होणार आहेत. प्रभू राजगडकर यांची प्रमुख उपस्थिती राहील. नीलकांत ढोले, गोविंद वाघमारे, हृदय चक्रधर, महेंद्र गायकवाड, संजय गोडघाटे, दीपक रंगारी, सुरेश वर्धे, प्रसेनजित गायकवाड, भोला सरवर, भूषण रामटेके, संजय ओरके, खेमराज भोयर, शालिक जिल्हेकर, पूनम येसंबरे, प्रमोद नारायणे, संजय सायरे, प्रकाश कांबळे, अजिजखान पठाण, मनोहर नाईक, शुभांगी भोयर, राजेश ढंभारे, प्रशांत ढोले, अशोक गौरखेडे, मनोहर गजभिये, प्रकाश बनसोड, प्रकाश दुलेवाले, विशाखा कांबळे, प्रमोद काळबांडे, अविनाश महालक्ष्मे, उद्धव नारनवरे यांच्यासह इतरही कवी सहभागी होतील.

# 'बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता' यावर होणार मंथन

## आंबेडकर महाविद्यालयात ३० जानेवारीला चर्चासत्र

**लोकशाही वार्ता / नागपूर**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीद्वारा संचालित डॉ. आंबेडकर कॉलेज, दीक्षाभूमी येथे ३० जानेवारी रोजी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता' या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. दीक्षाभूमी येथील दादासाहेब कुंभारे सभागृहात हे चर्चासत्र होईल.

बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या जीवनात केलेल्या पत्रकारितेचे स्मरण व्हावे व त्यांच्या कार्याला अभिवादन करण्यासाठी या राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे. ३० जानेवारी रोजी सकाळी १० वा. ज्येष्ठ साहित्यिक, संपादक प्रा. सुरेश द्वादशीवार यांच्या हस्ते चर्चासत्राचे उद्घाटन होईल. अध्यक्षस्थानी स्मारक समितीचे अध्यक्ष भंते आर्य नागार्जुन सुरई ससाई राहतील. मार्गदर्शक सदानंद फुलझेले, समितीचे सदस्य एन. आर. सुटे, विलास गजघाटे यांची प्रमुख उपस्थिती राहील. प्रस्ताविक व बिजभाषण आंबेडकर विद्यालयाच्या मराठी विभागाचे प्रमुख प्रा. दीपककुमार खोब्रागडे करतील. पहिले सत्र दुपारी १२. ३० वा. सुरू होईल. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता असा पहिल्या सत्राचा विषय असून, अध्यक्षस्थानी 'महानायक'चे संपादक सुनील खोब्रगडे असतील. तर प्रा. जावेद पाशा, डॉ. विद्याधर बन्सोड, डॉ. सिद्धार्थ बुटेले, डॉ. विशाखा कांबळे, नरेंद्र शेलार, मनोहर नाईक, शंकर बागडे हे वक्ते विचार मांडतील.

# मूकनायक शताब्दी महोत्सवानिमित्त उद्या राष्ट्रीय चर्चासत्र

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नागपूर :** डॉ. आंबेडकर महाविद्यालयाच्या दादासाहेब कुंभारे सभागृहात मूकनायक शताब्दी महोत्सवानिमित्त महाविद्यालयाच्या मराठी विभागाच्या वतीने ३० जानेवारीला राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित करण्यात आले आहे.

चर्चासत्राचे उद्घाटन ३० जानेवारीला सकाळी १० वाजता ज्येष्ठ संपादक व विचारवंत प्रा. सुरेश द्वादशीवार यांच्या हस्ते करण्यात येईल. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे अध्यक्ष भन्ते नागार्जुन सुरई ससाई राहतील. यावेळी सदानंद फुलझेले मार्गदर्शन करतील.

विशेष अतिथी म्हणून संस्थेचे सदस्य एन.आर सुटे, विलास गजघाटे, तर प्रमुख अतिथी म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य आर.व्ही. पाटील उपस्थित राहतील. दुपारी १२.३० वाजता 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता' या विषयावरील पहिल्या सत्राच्या अध्यक्षस्थानी सुनील खोब्रागडे राहतील.

प्रा. जावेद पाशा, डॉ. विद्याधर बन्सोड, डॉ. सिद्धार्थ बुटले, डॉ. विशाखा कांबळे, नरेंद्र शेलार, डॉ. मनोहर नाईक, डॉ. शंकर बागडे संबंधित विषयावर विचार मांडतील. दुपारी २ वाजता सुरू होणाऱ्या दुसऱ्या सत्राच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार शैलेश पांडे राहतील.

या सत्रात 'पुरोगामी चळवळी आणि आजची पत्रकारिता' या विषयावर डॉ. सतीश पावडे, डॉ. बळवंत भोयर, डॉ. भीमराव गोटे, सुरेंद्र गोंडाणे, महेंद्र गायकवाड, डॉ. ईश्वर सोमनाथे आणि डॉ. भूषण रामटेके विचार व्यक्त करतील. 'मूकनायक' ला कवितेच्या माध्यमातून अभिवादन करण्यासाठी शताब्दी काव्यसंमेलनाचे आयोजनही याच दिवशी केले आहे.

लोकसत्ता Wed, 29 January 2020
https://epaper.loksatta.com/c/48443326

तरुण भारत
Apla Nagpur | 2020-01-30 | Page- 7

# मूकनायक शताब्दी महोत्सव राष्ट्रीय चर्चासत्र आज

## दादासाहेब कुंभारे सभागृह, दीक्षाभूमी येथे आयोजन

◆ नागपूर, २९ जानेवारी

डॉ. आंबेडकर कॉलेज मराठी विभागाच्या वतीने गुरुवार ३० जानेवारी रोजी सकाळी १० वाजता दादासाहेब कुंभारे सभागृह, दीक्षाभूमी येथे मूकनायक शताब्दी महोत्सवानिमित्त राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे.

या कार्यक्रमाचे उद्घाटन वरिष्ठ पत्रकार सुरेश द्वादशीवार यांच्या हस्ते होईल. अध्यक्षस्थानी भदंत नागार्जुन सुरेई ससाई, मार्गदर्शक म्हणून सदानंद फुलझेले तर प्रमुख अतिथी म्हणून एन. आर. सुटे, विलास गजघाटे व प्राचार्य आर. व्ही. पाटील उपस्थित राहतील. कार्यक्रमाचे पहिले सत्र दुपारी १२.३० वाजता होईल. यावेळी 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता' या विषयावर प्रा. जावेद पाशा, डॉ. विद्याधर बन्सोड, डॉ. सिद्धार्थ बुटले, डॉ. विशाखा कांबळे, नरेंद्र शेलार, डॉ. मनोहर नाईक व डॉ. शंकर बागडे मार्गदर्शन करतील. अध्यक्षस्थानी सुनील खोब्रागडे राहतील. तर दुसरे सत्र ज्येष्ठ पत्रकार शैलेश पांडे यांच्या अध्यक्षतेखाली होईल. याप्रसंगी 'पुरोगामी चळवळी आणि आजची पत्रकारिता' या विषयावर डॉ. सतीश पावडे, डॉ. बळवंत भोयर, डॉ. भीमराव गोटे, सुरेंद्र गोंडाणे, महेंद्र गायकवाड, डॉ. ईश्वर सोमनाथे व डॉ. भूषण रामटेके मार्गदर्शन करतील. या राष्ट्रीय व्याखानाचा नागरिकांनी मोठ्या संख्येने लाभ घ्यावा, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

◂ *(तभा वृत्तसेवा)*

Powered by Bharati Web Pvt Ltd

लोकमत

भंते नागार्जुन सुरई ससाई : 'बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता' राष्ट्रीय चर्चासत्राचे उद्घाटन

# बाबासाहेब आंबेडकरांची पत्रकारिता प्रखर होती

लोकमत न्यूज नेटवर्क

**नागपूर** : वंचित, शोषितांच्या समस्यांना वाचा फोडण्यासाठी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी मूकनायक पाक्षिक सुरु केले. या पाक्षिकातून समाजातील वंचितांचे प्रश्न मांडण्याचे काम केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता प्रखर स्वरुपाची होती, असे प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती दीक्षाभूमीचे अध्यक्ष भंते नागार्जुन सुरई ससाई यांनी केले.

डॉ. आंबेडकर कॉलेज दीक्षाभूमीच्या मराठी विभागातर्फे मूकनायक शताब्दी महोत्सवानिमित्त डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता या राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले. चर्चासत्राचे उद्घाटन ज्येष्ठ संपादक तथा विचारवंत सुरेश द्वादशीवार यांनी केले.



डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता राष्ट्रीय चर्चासत्राचे दीपप्रज्वलन करून उद्घाटन करताना भंते नागार्जुन सुरई ससाई, वनराईचे विश्वस्त गिरीश गांधी, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे सदस्य विलास गजघाटे आणि इतर

अध्यक्षस्थानी भंते नागार्जुन सुरई ससाई होते. व्यासपीठावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे सदस्य एन. आर. सुटे, विलास गजघाटे, डॉ. आंबेडकर महाविद्यालयाचे प्राचार्य अरविंद भोयर, मराठी विभागप्रमुख प्रा. दीपककुमार खोब्रागडे उपस्थित होते. भंते नागार्जुन सुरई ससाई म्हणाले, मूकनायकातून बाबासाहेबांनी दलितांच्या समस्यांना वाचा फोडली. तत्कालीन प्रश्न, मानवी मूल्यांना स्थान देण्यासाठी मूकनायकने महत्त्वाची कामगिरी बजावली. ज्येष्ठ संपादक सुरेश द्वादशीवार म्हणाले, नायक हा बोलता असतो. परंतु बाबासाहेबांचा नायक हा मूक होता. समाजाला बोलते करण्यासाठी त्यांनी आपल्या पाक्षिकाला मूकनायक हे नाव दिले. संत तुकारामांचा अभंग ते मूकनायकात टाकायचे. बहिष्कृत भारतात ते ज्ञानेश्वरांच्या ओवी टाकत. प्रगतीच्या प्रत्येक टप्प्यावर बाबासाहेब आक्रमक होत गेले. मूकनायकाच्या पहिल्याच अग्रलेखात त्यांनी देशाला स्वातंत्र्य मिळत असून वंचित वर्ग मागे राहू नये, अशी अपेक्षा व्यक्त केली होती. त्यांनी लिहिलेला प्रत्येक शब्द समाजाच्या अंत:करणाला भिडणारा होता. परंतु आजची पत्रकारिता गल्लाभरु आणि बाजारु झाली असल्याची खंत त्यांनी व्यक्त करून, लोकशाहीचे चारही स्तंभ स्वच्छ राहिले नसल्याची टीका त्यांनी केली. विलास गजघाटे यांनी बाबासाहेब आंबेडकर निर्भीड संपादक असल्याचे मत व्यक्त केले. प्रास्ताविक प्रा. दीपककुमार खोब्रागडे यांनी केले. संचालन डॉ. रवींद्र तिरपुडे यांनी केले. आभार प्रा. अमित दुर्योधन यांनी मानले.

### विविध सत्रात मान्यवरांचे मार्गदर्शन

मूकनायक शताब्दी महोत्सवाच्या पहिल्या सत्रात प्रा. जावेद पाशा, सुनील खोब्रागडे, डॉ. विद्याधर बन्सोड, डॉ. सिद्धार्थ बुटले, दुसऱ्या सत्रात ज्येष्ठ संपादक शैलेश पांडे यांनी मार्गदर्शन केले. समारोपीय कार्यक्रमात ज्येष्ठ संपादक प्रकाश दुबे, ज्येष्ठ संपादक श्रीपाद अपराजित, मेंदूरोग तज्ज्ञ डॉ. चंद्रशेखर मेश्राम यांनी मार्गदर्शन केले.

Hello Nagpur
Page No. 3 Jan 31, 2020
Powered by: erelego.com

# शोषितांचे बातमीपत्र नव्हे तर संदेशपत्र होते 'मूकनायक'

## प्रा. सुरेश द्वादशीवार यांचे प्रतिपादन : मूकनायक शताब्दी महोत्सव

**लोकशाही वार्ता / नागपूर**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता ही त्यागावर आधारित होती. त्यांनी समाजनिष्ठा आणि राष्ट्रनिष्ठेमध्ये कधीच अंतर ठेवले नाही. आजच्या वर्तमानपत्रांनीही समाजनिष्ठेचे भान ठेवावे, असे आवाहन ज्येष्ठ साहित्यिक, संपादक प्रा. सुरेश द्वादशीवार यांनी केले. तसेच बाबासाहेबांनी सुरू केलेले 'मूकनायक' हे पाक्षिक केवळ शोषितांचे बातमीपत्र नव्हते तर संदेशपत्र होते, असेही त्यांनी अधोरेखित केले.




मंचावर भंते नागार्जुन सुरई ससाई, प्रा. सुरेश द्वादशीवार, एन.आर. सुटे, विलास गजघाटे, प्राचार्य आर.व्ही. पाटील, डॉ. गिरीश गांधी, प्रा. दीपक खोब्रागडे

डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीद्वारा संचालित डॉ.आंबेडकर महाविद्यालयात मूकनायक शताब्दी महोत्सवाअंतर्गत 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची पत्रकारिता' या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. गुरुवारी सकाळी महाविद्यालयातील दादासाहेब कुंभारे सभागृहात प्रा. द्वादशीवार यांच्या हस्ते उद्घाटन सोहळा पार पडला. डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या जीवनात केलेल्या पत्रकारितेचे स्मरण व्हावे व त्यांच्या या कार्याला अभिवादन करण्यासाठी आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भंते नागार्जुन सुरई ससाई होते. तर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे सदस्य एन.आर. सुटे व विलास गजघाटे, महाविद्यालयाचे प्राचार्य आर.व्ही. पाटील, वनराई फाऊंडेशनचे अध्यक्ष गिरीश गांधी, महाविद्यालयातील मराठी विभागप्रमुख प्रा. दीपक खोब्रागडे यांची प्रमुख उपस्थिती होती. १९२० हे वर्ष देशाच्या इतिहासातील महत्त्वपूर्ण वर्ष होते. याच काळात सामाजिक समतेकरिता (पान ६ वर)

## मूकनायक शताब्दी महोत्सव में वरिष्ठ पत्रकार द्वादशीवार ने कहा

# बाबासाहब और गांधी जैसे पत्रकारों की जरूरत





**नगर प्रतिनिधि| नागपुर.** वर्तमान में पत्रकारिता मालिक, उद्योगपति और राजनीति में फंसी हुई है। पत्रकारिता की स्वतंत्रता के सवाल पर एक संपादक का कहना था कि मीडिया को बहुत कम स्वतंत्रता है, जबकि बाबासाहब के मूकनायक में संत तुकाराम का स्लोगन और बहिष्कार भारत में संत ध्यानेश्वर का स्लोगन था। इसे धार्मिक दृष्टि से उन्होंने कभी नहीं देखा। हालांकि बाद में वह आक्रामक होते चले गए। यह बात वरिष्ठ पत्रकार सुरेश द्वादशीवार ने कही। वे डॉ. बाबासाहब आंबेडकर द्वारा प्रकाशित 'मूकनायक' समाचारपत्र के शताब्दी वर्ष पर आयोजित राष्ट्रीय चर्चासत्र 'मूकनायक शताब्दी महोत्सव 1920-2020' के अवसर पर गुरुवार को दीक्षाभूमि स्थित सभागृह में बोल रहे थे। कार्यक्रम का आयोजन डॉ. आंबेडकर कॉलेज दीक्षाभूमि के तत्वावधान में किया गया। शताब्दी महोत्सव के समापन समारोह के अध्यक्ष 'दैनिक भास्कर' के समूह संपादक प्रकाश दुबे ने कहा कि कार्यक्रम में महापुरुषों की तारीफ करना जानते हैं, लेकिन उनके बारे में जो बताया जा रहा है कि उसे पढ़ने का समय नहीं निकाल पाते। बाबासाहब का 'मूकनायक' समाचारपत्र निकालने का कारण दु:खियों की व्यथा सुनाना था या फिर कोई और कारण था, यह जानना जरूरी है। समाचारपत्र का नाम मूकनायक इसलिए नहीं रखा था कि वह मूक लोगों का नायक बन जाएं, बल्कि इसलिए रखा था कि जो मूक है वह हमारा नायक बन जाए। वह उसे अवसर देना चाहते थे। श्री दुबे ने कहा कि यह सभी जानते हैं कि जो अच्छी चीज होती है उन्हें चलाना कितना मुश्किल होता है। मूकनायक 31 जनवरी 1920 में आरंभ हुआ और 1923 को उसे बंद करना पड़ा। उन्होंने बहिष्कृत भारत समाचारपत्र भी निकाला। इसके माध्यम से वह यह बताना चाहते थे कि उस समय जिस तरह से आजादी की तैयारी चल रही थी उसमें एक हिस्सा बहिष्कृत होने की स्थिति में दिखाई पड़ रहा था। समापन समारोह में प्रमुख अतिथि न्यूरोसर्जन डॉ. चंद्रशेखर मेश्राम, वरिष्ठ पत्रकार श्रीपाद अपराजित, एन.आर. सुटे, दीपक खोब्रागड़े तथा वरिष्ठ कवि इमो नारनवरे उपस्थित थे। मुख्य अतिथि डॉ. मेश्राम ने कहा कि मूकनायक पर किसी भी महाविद्यालय में इसलिए कार्यक्रम आयोजित नहीं किए गए, क्योंकि 91 फीसदी महाविद्यालय न्यूनतम की श्रेणी में आते हैं, जबकि अधिकतम श्रेणी में 9 फीसदी महाविद्यालय हैं और डॉ. आंबेडकर महाविद्यालय 9 फीसदी में शामिल हैं। मूक में नायक नहीं है और जो नायक है वह मूक हो गए हैं। उन्हें कह दिया गया कि बोलने की जरूरत नहीं है। वर्ल्ड प्रेस फ्रीडम में 180 देशों में भारत 140वें स्थान पर है। वरिष्ठ पत्रकार अपराजित ने कहा कि मूकनायक में बाबासाहब ने कहा था कि एक जाति की यदि अवनति होती है, तो दूसरी जाति को उसकी उपेक्षा नहीं करनी चाहिए। इतिहास भूलने वाला कभी भी इतिहास नहीं बना सकता है। संचालन डॉ. रवींद्र तिरपुड़े ने किया।

दैनिक भास्कर
Fri, 31 January 2020
https://epaper.bhaskarhindi.com/c/48514612

तरुण भारत
Apla Nagpur | 2020-02-28 | Page- 5

## मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा



मराठी ही महाराष्ट्रातील प्रत्येक माणसाची ज्ञानाची व संस्कृतीची जोपासना करणारी भाषा आहे. कुसुमाग्रजांनी मराठी भाषेत उत्कृष्ट साहित्य निर्माण करून मराठीला व मराठी माणसाला ज्ञानाच्या क्षेत्रात अग्रेसर केले आहे. त्यामुळे प्रत्येक मराठी माणसाने मराठी भाषेचा गुणगौरव केला पाहिजे. अभिजात भाषेचा दर्जा मराठीला प्राप्त झाला पाहिजे, असे प्रतिपादन प्रा. दीपककुमार खोब्रागडे यांनी केले. डॉ. आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी येथे मराठी विभागातर्फे मराठी भाषा गौरव दिवस साजरा करण्यात आला. यावेळी अध्यक्षस्थानावरून प्रा. खोब्रागडे बोलत होते. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून वाणिज्य विभागाचे डॉ. विवेक खूनकर, डॉ. प्रभज्योत कौर, डॉ. रवींद्र तिरपुडे आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना प्रा. खोब्रागडे म्हणाले, जगात मराठी भाषेला उंचीवर पोचविण्याचे काम मराठीतील दलित साहित्याने केले. उपरा, उचल्या, बलुतं यासारख्या मराठी आत्मचरित्राने मराठी भाषेचा गौरव जगात केला. त्यामुळे विद्यार्थ्यांनी मराठी भाषेतून आपल्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावून घेतल्या पाहिजे, असे मत त्यांनी व्यक्त केले. यावेळी उपस्थित मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक डॉ. रवींद्र तिरपुडे यांनी केले. संचालन अंकित मालखेडे यांनी तर आभार निखिल मोटघरे यांनी मानले.

◂ *(तभा वृत्तसेवा)*

Powered by Bharati Web Pvt Ltd

# मराठी भाषेला अभिजात दर्जा मिळाला पाहिजे - प्रा.खोब्रागडे

**लोकशाही वार्ता / नागपूर**



मराठी ही महाराष्ट्रातील प्रत्येक माणसाची ज्ञानाची व संस्कृतीची जोपासना करणारी भाषा आहे. कुसुमाग्रजांनी मराठी भाषेत उत्कृष्ठ साहित्य निर्माण करून मराठीला व मराठी माणसाला ज्ञानाच्या क्षेत्रात अग्रेसर केल आहे. त्यामुळे प्रत्येक मराठी माणसाने मराठी भाषेचा गुणगौरव केला पाहिजे आणि अभिजात भाषेचा दर्जा मराठीला प्राप्त झाला पाहिजे, असे प्रतिपादन प्रा. दीपककुमार खोब्रागडे यांनी केले.

डॉ.आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी, येथे मराठी विभागातर्फे मराठी भाषा गौरव दिवस साजरा करण्यात आला. याप्रसंगी अध्यक्षस्थानी प्रा. दीपककुमार खोब्रागडे बोलत होते. प्रमुख पाहुणे म्हणून, वाणिज्य विभागाचे डॉ.विवेक खुनकर, डॉ. प्रभज्योत कौर व मराठीचे प्रा. डॉ. रवींद्र तिरपूडे मंचावर उपस्थित होते. पुढे ते महणाले, जगात मराठी भाषेला पोहोचण्याचे काम मराठीतील दलित साहित्याने केले. उपरा, उचल्या, बलुत यासारख्या मराठी आत्मचरित्राने मराठी भाषेचा गौरव जगात केला. त्यामुळे विद्यार्थ्यांनी मराठी भाषेतून आपल्या ज्ञानाच्या कक्षा वृंदावल्या पाहिजे. इतर, भाषेच्या तुलनेत मराठी भाषेचा गोडवा काही अधिकच असतो असे त्यानी सॅगितले. डॉ. प्रभज्योत कौर यांनी भारतातील अनेक भाषिकांना आपल्या भाषेचा गौरव केला पाहिजे व आपली सरकती टिकवून ठेवण्यासाठी मातृभाषेतूनच बोलले पाहिजे, असा संदेश त्यांनी दिला. संचालन अंकित मालखेडे यांनी तर आभार निखिल मोटघरे यांनी मानले.

याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# डॉ. आंबेडकर महाविद्यालय



**नागपूर** : दीक्षाभूमीस्थित डॉ. आंबेडकर महाविद्यालयात मराठी विभागातर्फे मराठी भाषा गौरव दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी प्रा. दीपककुमार खोब्रागडे तर प्रमुख पाहुणे म्हणून वाणिज्य विभागाचे डॉ. विवेक खूणकर, डॉ. प्रभज्योत कौर व मराठी वाङ्मय मंडळाचे प्रा. डॉ. रवींद्र तिरपुडे उपस्थित होते. यावेळी प्रा. खोब्रागडे म्हणाले, मराठी ही महाराष्ट्रातील प्रत्येक माणसाची ज्ञानाची व संस्कृतीची जोपासना करणारी भाषा आहे. कुसुमाग्रजांनी मराठी भाषेत उत्कृष्ट साहित्य निर्माण करून मराठीला व मराठी माणसाला ज्ञानाच्या क्षेत्रात अग्रेसर केले आहे. त्यामुळे प्रत्येक मराठी माणसाने मराठी भाषेचा गुणगौरव केला पाहिजे आणि अभिजात मराठी भाषेचा दर्जा मराठीला प्राप्त झाला पाहिजे. डॉ. विवेक खूणकर यांनी मराठी भाषा किती महत्त्वाची आहे, याविषयी मार्गदर्शन केले. इंग्रजी, हिंदी भाषेच्या तुलनेत मराठी भाषेचा गोडवा काही अधिकच असतो, असेही त्यांनी सांगितले. संचालन अंकित मालखेडे यांनी तर आभार निखिल मोटघरे यांनी मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ऑनलाईन कविसंमेलन रविवारी

◆ **नागपूर, १४ मे**

जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळ आणि डॉ. आंबेडकर महाविद्यालय पदवी व पदव्युत्तर मराठी विभागाच्या संयुक्त विद्यमाने रविवार १७ मे रोजी दुपारी ३ वाजता ऑनलाईन राष्ट्रीय कविसंमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे.

हे कविसंमेलन ऑनलाईन (झूम व्हिडियो कॉन्फरन्सिंग) होईल. डॉ. बळवंत भोयर यांच्या अध्यक्षतेखाली होणाऱ्या या संमेलनाचे उद्घाटन डॉ. विद्याधर बन्सोड यांच्या हस्ते होईल. प्रास्ताविक डॉ. रवींद्र तिरपुडे करतील. या कविसंमेलनात प्रा. दीपककुमार खोब्रागडे, डॉ. विशाखा कांबळे, डॉ. भूषण रामटेके, प्रसेन्नजित गायकवाड, प्रा. दीपक रंगारी, डॉ. हिरालाल मेश्राम, महेंद्र गायकवाड, ॲड. भूपेश पाटील, डॉ. तीर्थराज कापगते, प्रा. मीनल येवले, प्रतिमा नंदेश्वर, प्रा. भारती दवणे, डॉ. गणेश चव्हाण, संजय गोडघाटे, कल्याण श्रावस्ती, संदीप गायकवाड, डॉ. मनोहर नाईक, नागेश वाहुरवाघ, कुमार आहेर, नंदू वानखेडे, चंपा भारद्वाज, शैलेश साऊतकर, प्रा. भारतभूषण शास्त्री, डॉ. लीना निकम, उज्ज्वला अंधारे, संगीता वाईकर, डॉ. मनोहर नराजे, प्रा. प्रमोद नारायणे, प्रा. विजय सोरते, गणेश पांडे, रमेश बेलगे, पी. जी. भोसले, कोमलकांता बन्सोड आणि अरुणा भोंडे आदी कवी भाग घेणार आहेत. हे कविसंमेलन आपल्या मोबाईलमध्ये झूम ॲप डाऊनलोड करून पाहता येईल.

◂ *(तभा वृत्तसेवा)*

# आॅनलाईन राष्ट्रीय कवी संमेलनात राज्यभरातील कवींचा सहभाग

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**नागपूर :** करोनाच्या सावटात जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळ व डॉ आंबेडकर महाविद्यालय दीक्षाभूमी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित ऑनलाईन तीन दिवसीय राष्ट्रीय कविसंमेलनात राज्यातील विविध भागातील ७० च्यावर नवोदित आणि मान्यवर अशा कवींनी वेगवेगळ्या आशयाच्या कविता सादर केल्या. संमेलनात तीन दिवस कवितेचा आस्वाद ऑनलाईन पद्धतीने मान्यवर कवी आणि रसिकांनी घेतला.

या कवीसंमेलनाचे उद्घाटन साहित्यिक व कवी डॉ. विद्याधर बनसोड यांनी केले. कवी डॉ. बळवंत भोयर, आंबेडकरवादी विचारवंत व साहित्यिक डॉ. अनिल सूर्या हैद्राबाद येथील लेखिका व कवयित्री मीना खोंड व जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष प्रा. दीपककुमार खोब्रागडे संमेलनात सहभागी झाले होते. यावेळी भिवापूरच्या ज्येष्ठ कवयित्री कोमल कांता बनसोड यांनी करोनाच्या संदर्भात कविता सादर केली तर गणेश पांडे यांनी आशयसंपन्न युद्ध मानवाचे ही कविता अतिशय प्रभावीपणे सादर करून नवे सामाजिक भान दिले. नव्या पिढीतील कवी प्रा. विजय सोरते यांनी पत्र ही सामाजिक भान दर्शवणारी अप्रतिम कविता सादर केली. त्यानंतर दुसऱ्या दिवशी ज्येष्ठ कवी पी.जी. भोसले, संजय गोडघाटे, संदीप गायकवाड, प्रा. प्रमोद नारायणे, निमिषा मोहरीर, औरंगाबादचे ज्येष्ठ कवी डॉ. यशवंत खडसे, ज्येष्ठ कवयित्री चित्रा कहाते, हृदय चक्रधर यांनी विविध विषयावरील कविता सादर केल्या.

यावेळी डॉ. विद्याधर बनसोड म्हणाले, ऑनलाईन पद्धतीने होणारे सदर राष्ट्रीय कविसंमेलन हे देशातील पहिले संमेलन आहे. आजच्या सामाजिक वास्तवाचे त्यांनी विविध स्वरूपात सुंदर मांडणी केली. श्रम व्यवस्थेसंदर्भात नवे आकलन मांडले. प्रा. नंदू वानखडे, प्रसन्नजीत गायकवाड, डॉ. तीर्थराज कापगते, प्रा. मीनल येवले, डॉ. मनोहर नराजे, डॉ. लीना निकम, उज्ज्वला अंधारे, चित्रकार शैलेश सऊतकर, डॉ वीणा राऊत, प्रतिमा नंदेश्वर, संगीता वाईकर, नागेश वाहूरवाघ, प्रकाश कांबळे, प्रेमा लेकुरवाळे, रमेश बेलगे यांनीही कविता सादर केल्यात. डॉ. मीना खोंड व डॉ. विशाखा कांबळे यांनी विचार व्यक्त केले. प्रास्ताविक डॉ. रवींद्र तिरपुडे यांनी तर निवेदन डॉ. बळवंत भोयर यांनी केले व आभार दीपक कुमार खोब्रागडे यांनी मानले.

तरुण भारत
Nagpur Main | 2020-06-07 | Page- 7

# ‘जागतिक साहित्य आणि शैक्षणिक आव्हाने’वर चर्चासत्र

## जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळाचा कार्यक्रम

◆ **नागपूर, ६ जून**

जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळ आणि डॉ. आंबेडकर कॉलेज, दीक्षाभूमी, सर जे. जे. उपयोजित कला महाविद्यालय मुंबई, आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन सातारा, श्रीमती एल. आर. टी. कॉलेज ऑफ कॉमर्स अकोला, कला व विज्ञान महाविद्यालय भालोद जळगाव, शरद पवार आर्ट्स व कॉमर्स कॉलेज गडचांदूर, सुवालाल पाटणी कला व वाणिज्य महाविद्यालय पुलगाव यांच्या संयुक्त विद्यमाने ‘कोरोना : जागतिक साहित्य व शिक्षणापुढील आव्हाने’ विषयावर ऑनलाईन आंतरराष्ट्रीय चर्चासत्र रविवार १४ जून रोजी दुपारी २ वाजता आयोजित करण्यात आले आहे.

चर्चासत्राचे उद्‌घाटन लेखक डी. के. पंजामूर्ती मलेशिया, बीजभाषण मराठा सेवा संघाचे अध्यक्ष पुरुषोत्तम खेडेकर, संपादक श्रीपाद अपराजित यांच्या उपस्थितीत होईल. अध्यक्षस्थानी महामंडळाचे अध्यक्ष प्रा. दीपककुमार खोब्रागडे राहतील. यावेळी डॉ. समोरंमोन चुआन थायलंड, केविन हेन्स अमेरिका, डॉ. केले हुआंग तायवान मार्गदर्शन करणार आहेत. कोरोनामुळे जगातील मानवी जीवनापुढे भयंकर प्रश्न निर्माण झाले आहेत. एकूणच जग कोरोनाच्या दहशतीत आपल्या जीवनाचा प्रवास करीत असल्याचे आपण पाहत आहोत. या सर्व पार्श्वभूमीवर त्याचा परिणाम विविध ज्ञानशाखांवर पडलेला दिसतो. यावर वाङ्‌मयीन व शैक्षणिक दृष्टीने वैचारिक मंथन व अभ्यासपूर्ण चर्चा होईल. हे चर्चासत्र ऑनलाईनच्या माध्यमातून घेतले जाईल. https://chat.whatsapp.com/LjzJfVWztXp228CVfqoTee या लिंकवर क्लिक करून चर्चासत्रात सहभागी होता येईल, असे आवाहन सुजित मुरमाडे, डॉ. संतोष क्षीरसागर, प्राचार्य प्रा. आर. व्ही. पाटील, प्राचार्य डॉ. एस. जी. चापके, प्राचार्य डॉ. व्ही. एस. नलावडे, प्राचार्य डॉ. ए. एस. कोल्हे, प्राचार्य डॉ. संजयकुमार सिंग, प्राचार्य डॉ. भूषण रामटेके, डॉ. रवींद्र तिरपुडे यांनी केले आहे.

◀*(तभा वृत्तसेवा)*

Powered by Bharati Web Pvt Ltd

महाराष्ट्र टाइम्स नागपूर । मंगळवार, ९ जून २०२०

# करोनानंतरच्या आव्हानांवर येत्या रविवारी चर्चासत्र

**म. टा. प्रतिनिधी,** नागपूर

जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळ, डॉ. आंबेडकर कॉलेज, दीक्षाभूमी आणि विविध महाविद्यालयांच्या वतीने ‘करोनाः जागतिक साहित्य व शिक्षणापुढील आव्हाने’ या विषयावरील ऑनलाइन आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन १४ जून रोजी करण्यात आले आहे. रविवारी दुपारी २ वाजता होणाऱ्या या चर्चासत्राचे बीजभाषण मराठा सेवा संघाचे संस्थापक पुरुषोत्तम खेडेकर करतील.

मलेशिया येथील आंतरराष्ट्रीय कीर्तीचे लेखक आणि पत्रकार डी. के. पंजामूर्ती यांच्या हस्ते चर्चासत्राचे उद्‌घाटन केले जाईल. प्रमुख अतिथी म्हणून ‘महाराष्ट्र टाइम्स’, नागपूरचे निवासी संपादक श्रीपाद अपराजित उपस्थित राहतील. जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळाचे अध्यक्ष दीपककुमार खोब्रागडे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहतील. याशिवाय, थायलंड येथील लेखिका डॉ. समोरंमोन चुआन, अमेरिकेतील पत्रकार केविन हेन्स, तायवान येथील लेखक डॉ. केले हुआंग हेदेखील यावेळी उपस्थित राहतील. मुंबई येथील सर ज. जी. उपयोजित कला महाविद्यालय, आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन, सातारा, श्रीमती एल. आर. टी. कॉलेज ऑफ कॉमर्स, अकोला, कला व विज्ञान महाविद्यालय, भालोद, जिल्हा जळगाव, शरदराव पवार आर्टस व कॉमर्स कॉलेज, गडचांदूर, जिल्हा चंद्रपूर, सुवालाल पाटणी कला व वाणिज्य महाविद्यालय, पुलगाव यांचाही या आयोजनात सहभाग आहे.

करोनाने विविध क्षेत्रात निर्माण केलेल्या आव्हानांवर वाङ्‌मयीन व शैक्षणिक दृष्टीने वैचारिक मंथन व अभ्यासपूर्ण चर्चा व्हावी, हा दृष्टिकोन समोर ठेवून हे आंतरराष्ट्रीय चर्चासत्र घेण्यात येते आहे. चर्चासत्रात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या प्राध्यापक, संशोधक आणि विद्यार्थ्यांना https://forms.gle/j4mZwZJirCHAhqs46 खालील लिंकवर नावनोंदणी करावी लागेल.

या आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात सहभाग नोंदविल्याचे ई-प्रमाणपत्र ई-मेलच्या माध्यमातून दिले जाईल.

या चर्चा सत्राची लिंक व्हॉटसअॅप ग्रुपवर दिली जाईल. त्यासाठी खालील लिंकच्या https://chat.whatsapp.com/LjzJfVWztXp228CVfqoTee माध्यमातून ग्रुपमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन सुजित मुरमाडे, डॉ. संतोष क्षीरसागर, प्राचार्य आर. व्ही. पाटील. डॉ. एस.जी. चापके, मुख्य संयोजक डॉ. रवींद्र तिरपुडे यांच्यासह इतरांनी केले आहे.


महाराष्ट्र टाइम्स नागपूर । रविवार, २८ जून २०२०

# साहित्याने प्रतिक्रियावादी नव्हे, क्रियावादी व्हावे

## ऑनलाइन चर्चासत्रात पुरुषोत्तम खेडेकर यांचे प्रतिपादन

**म.टा. प्रतिनिधी**, नागपूर

'वर्तमानाचा विचार करता आजचे साहित्य हे प्रतिक्रियावादी होण्यापेक्षा क्रियावादी होणे गरजेचे आहे', असे प्रतिपादन मराठा सेवा संघाचे संस्थापक पुरुषोत्तम खेडेकर यांनी केले. जागतिक आंबेडकरवादी साहित्य महामंडळ आणि विविध शैक्षणिक संस्थांच्या संयुक्त विद्यमाने 'करोना : जागतिक साहित्य व शिक्षणापुढील आव्हाने' विषयावर अलीकडेच आयोजित वेबिनारच्या बीजभाषणात त्यांनी हे विचार व्यक्त केले.



पुरुषोत्तम खेडेकर



दीपककुमार खोब्रागडे

या वेबिनारचे उद्घाटन मलेशियातील पत्रकार व आंबेडकरवादी विचारवंत डॉ. डी. के. पंजामूर्ती यांनी केले. लेखक प्रा. दीपककुमार खोब्रागडे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या वेबिनारला प्रमुख अतिथी म्हणून थायलंडच्या लेखिका समोरंजोन चुआन तसेच 'मटा'च्या नागपूर आवृत्तीचे संपादक श्रीपाद अपराजित उपस्थित होते.

सुसंस्कृताने सर्जनशील होणे महत्त्वाचे आहे. सर्व परिवर्तनवादी चळवळींनी एकत्र येऊन सामाजिक समता प्रस्थापित करावी', अशी अपेक्षा व्यक्त करतानाच खेडेकर यांनी उपेक्षित बालसाहित्याविषयीची चिंता व्यक्त केली. उद्घाटनीय भाषणात डॉ. पंजामूर्ती यांनी, 'करोना या वैश्विक महामारीने संपूर्ण जग संकटात असले तरी, मानवी विकासाला प्रेरक ठरणाऱ्या शिक्षण आणि साहित्यासंदर्भात सर्वांनीच गंभीर असावे', अशी अपेक्षा व्यक्त केली.

देश विभाजनानंतरच्या सर्वात मोठ्या श्रमिक स्थलांतराबाबत कल्पना नसणे हे अंतर्गत यंत्रणेचे अपयश असल्याचे मत व्यक्त करीत श्रीपाद अपराजित यांनी, तुलनेने लॉकडाउन काळातील चीन आणि अमेरिकेच्या संशोधन प्रक्रियेचा आढावा घेतला. प्रत्येक जिल्ह्यात बालभवन उभारण्याची गरजही त्यांनी व्यक्त केली.

या चर्चासत्रात प्राचार्य डॉ. एस. जी चाफले, प्राचार्य डॉ. व्ही. एस. नलावडे, प्राचार्य डॉ. ए. एस. कोल्हे, प्राचार्य डॉ. भूषण रामटेके, डॉ. वीणा राऊत, डॉ. सोनाली गाडेकर यांनी 'शिक्षण : करोनाचा संक्रमण काळ आणि साहित्य' या विषयावर विविध पैलूंनी प्रकाश टाकला. शैक्षणिक मूल्य पद्धती, नवे तंत्रज्ञान, आरोग्य तसेच करोनाची भीती आणि माणूस यासंदर्भातील विचार मांडले. तर प्राध्यापक व अभ्यासक मंडळींच्यावतीने डॉ. विशाखा कांबळे, डॉ. गोविंदराव कांबळे, डॉ. प्रकाश कांबळे व डॉ. दत्ताराव यांनी अभ्यासपूर्ण विवेचन केले. वेबिनारचे सूत्रसंचालन डॉ. बळवंत भोयर यांनी केले.

मुख्य संयोजक डॉ. रवींद्र तिरपुडे यांनी प्रास्ताविकातून आयोजकांची भूमिका मांडली. डॉ. सावंत वेबिनारचे तंत्रनिर्देशक होते. आभार डॉ. वीणा राऊत यांनी मानले. या आंतरराष्ट्रीय चर्चासत्रात देशातील १४०० प्राध्यापक, संशोधकांनी सहभाग नोंदवला.